लोकमत पु. पान क्र. १

# पोलिस आयुक्तालयाला बळ

## मीरा-भाईंदर, वसई-विरारसाठी १,०८२ पदांना शासनाची मंजुरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा भाईंदर-वसई विरार पोलिस आयुक्तालयाच्या पोलिस दलात आणखी १ हजार ८० पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांची भर पडणार आहे. शासनाने १ ऑक्टोबर रोजी दुसऱ्या टप्प्यातील पद मंजुरीचा आदेश जारी केला आहे. यामुळे आयुक्तालयाचे बळ वाढून गुन्हेगारी रोखण्यासह कायदा सुव्यवस्था राखण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाचे सप्टेंबर २०२० मध्ये पहिले पोलिस आयुक्त म्हणून सदानंद दाते यांची नियुक्ती होऊन आयुक्तालय कार्यरत झाले होते.

पहिल्या टप्प्यात १ हजार २२ पदे मंजूर केली गेली होती, परंतु, मीरा-भाईंदर आणि वसई-विरार ही झपाट्याने वाढणारी दोन मोठी शहरे आणि गुन्ह्यांचे वाढते प्रमाण पाहता आणखी पोलिस बळाची आवश्यकता असल्याने तसा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित होता.




- जून २०२३ मध्ये तत्कालीन पोलिस महासंचालकांनी मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयासाठी आणखी १ हजार ८२ पदांना मंजुरी देण्यासह त्यासाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी देण्याची मागणी शासनाकडे केली होती.
- राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीच्या ९ जुलै २०२४ रोजी झालेल्या बैठकीतील मंजुरी आणि वित्त विभागाने दिलेल्या मंजुरीनुसार हा शासन निर्णय जारी केला गेला आहे.

### नव्याने भरती प्रक्रियेसह काहींना पदोन्नती मिळण्याची शक्यता

गृह विभागाचे उपसचिव रा. ता. भालवणे यांनी १ ऑक्टोबर रोजी राज्यपालांच्या आदेशाने शासन निर्णय जारी करत मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयासाठी दुसऱ्या टप्प्यातील १ हजार ८२ पदांच्या मंजुरी आणि त्यासाठी येणाऱ्या ६२ कोटी ४ लाख रुपयांच्या आवर्ती खर्चास तसेच ५ कोटी ७४ लाख ४८ हजार रुपये इतक्या अनावर्ती खर्चास शासनाने मंजुरी दिलेली आहे. हा खर्च हा त्या त्या वर्षीच्या उपलब्ध मंजूर अनुदानातून भागवला जाणार आहे. या नवीन पद मंजुरीमध्ये पोलिस शिपाई पदे ६८९ इतकी तर पोलिस हवालदार पदे १५६ इतकी आहेत. याशिवाय सहायक पोलिस उपनिरीक्षकांची ९७ पदे, चालक पोलिस शिपायांची ७७ पदे, चालक पोलिस हवालदारांची १७ पदे, चालक सहायक पोलिस उपनिरीक्षकांची ११ पदे प्रामुख्याने आहेत. याशिवाय कार्यालयीन अधीक्षक, लघुलेखक, लिपिकासह अन्य तांत्रिक पदेदेखील आहेत. पद मंजुरीमुळे आता नव्याने भरती प्रक्रियेसह काहींना पदोन्नतीही मिळण्याची शक्यता आहे.

# विरारच्या जीवदानी गडावर भाविकांची गर्दी

## नवरात्रीच्या पहिल्याच दिवशी मोठा उत्साह : राज्यभरातून भक्त येतात दर्शनाला

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** ५१ शक्तिपीठांपैकी एक असलेल्या विरारच्या जीवदानी देवीच्या दर्शनासाठी नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने पहिल्याच दिवशी हजारो भाविकांची गर्दी होत आहे. देवीचा गाभारा विविध रंगांच्या फुलांनी सजविण्यात आला आहे. देवीच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच भाविकांच्या रांगा लागलेल्या पाहायला मिळाल्या. लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या या देवीच्या भेटीसाठी राज्यभरातून भक्त येत असतात.



विरारच्या जीवदानी देवीच्या दर्शनासाठी नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने पहिल्याच दिवशी हजारो भाविकांनी गर्दी केली होती. (छाया : मंगेश कराळे)

- विरारच्या डोंगरावर जीवदानी मातेचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक दररोज येतात. जीवदानी मंदिर ट्रस्टने परिसरात अनेक सीसीटीव्ही कॅमेरे बसवले असून सुरक्षा रक्षक, पोलिस व होमगार्ड सुरक्षेसाठी आहेत.
- चार फूट उंच आणि अलंकारांनी भरलेली आकर्षक मूर्ती पाहण्यासाठी व दर्शनासाठी भाविक येतात. सुमारे २ ते ३ तास रांगेत उभे राहिल्यानंतर देवीचे दर्शन होते. काही भक्त पायऱ्यांवर गुडघ्यावर चालत, नारळ फोडत, मेणबत्ती लावत, हळदकुंकू लावत आईच्या दारात येतात.

लोकमत पू. पान क्र. 2

# दुचाकी घसरून एकाचा मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : २ ऑक्टोबरच्या पहाटे ४ च्या सुमारास भाईंदरच्या डोंगरी येथील भाईंदरवरून उत्तनकडे जाणाऱ्या रस्त्यावर धारावी मंदिर दिशेच्या रस्त्याच्या वळणावर दुचाकी घसरून पडली. अपघातात दुचाकीस्वार रस्त्याच्या कडेला असलेल्या नाल्यात जाऊन पडला. त्याला भाईंदरच्या पंडित भीमसेन जोशी सरकारी रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून त्याचा आधीच मृत्यू झाल्याचे घोषित केले. उत्तन सागरी पोलिसांनी घटनेची नोंद केली असून अधिक तपास सुरू आहे.

पू. पान क्र. 1




## अल्पवयीन मुलाचा अपघातात मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : गोखिवरेच्या भालपाडा येथील इस्लाम चाळीत राहणाऱ्या संजय भागडी (१३) या अल्पवयीन मुलाचा अपघाती मृत्यू झाला आहे.

बुधवारी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास संजय हा खेळण्यासाठी मधुबन परिसरात मित्रांबरोबर गेला होता. तो वेलंकणी बिल्डिंगजवळ, अवा लाइफ स्पेस यांच्या ऑफिससमोरील मोकळ्या जागेतून चालला होता. त्यावेळी एका पिकअप चालकाने निष्काळजीपणाने, त्याच्या ताब्यातील पिकअप वाहन मागे घेऊन संजयला धडक दिल्याने तो खाली पडून त्याच्या डोक्याला मागील बाजूला मार लागला. या अपघातामध्ये त्याचा मृत्यू झाला. वालीव पोलिसांनी आरोपी चालक सूरज म्हात्रे (२८) विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## तरुणाचा अपघाती मृत्यू



नालासोपारा : श्रीराम नगरच्या एल. आर. यादव चाळीत राहणाऱ्या पंकज यादव (२१) या तरुणाचा अपघाती मृत्यू झाला आहे. तो बुधवारी दीड वाजण्याच्या सुमारास मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील सोपारा फाटा येथे रस्ता क्रॉस करून त्याच्या शेठकडे पैसे घेण्यासाठी जात होता. त्याचवेळी भरधाव वेगातील वाहनाने रहदारीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून ठोकर मारल्याने वाहनाचे चाक हे पंकज याच्या डोक्यावरून गेल्याने गंभीर दुखापत होऊन त्याचा मृत्यू झाला. आरोपी वाहनचालक हा न थांबता पळून गेला. पेल्हार पोलिसांनी आरोपी चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## महिलेचे मंगळसूत्र खेचले

नालासोपारा : विरारच्या वावटेवाडीतील प्रचिती अपार्टमेंट बिल्डिंग नंबर १ मध्ये राहणाऱ्या शांता धुमाळ (४५) यांच्या गळ्यातून सोन्याचे मंगळसूत्र खेचून नेल्याची घटना घडली आहे. त्या मंगळवारी रात्री पावणे आठच्या सुमारास सब वे ते सेंट पीटर शाळेच्या मधल्या रस्त्यावरून पायी चालत येत असताना त्यांच्या पाठीमागून आलेल्या दुचाकीवरील तीन चोरट्यांपैकी एकाने त्यांच्या गळ्यातून १ लाख ४७ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र खेचून नेले आहे. विरार पोलिसांनी याप्रकरणी बुधवारी जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

## दुचाकी चोरीला

मीरा रोड : शांतीनगर सेक्टर-२ मध्ये राहणारे संजय रणछोड टांक यांचे पूजा साहित्य विक्री दुकान आहे. विश्वशांती सोसायटीजवळील रस्त्यावर त्यांनी रात्री उभी केलेली दुचाकी सकाळी चोरीला गेली असल्याचे आढळून आले. २ ऑक्टोबर रोजी नयानगर पोलिस ठाण्यात ३० हजार रुपये किमतीची दुचाकी चोरीला गेल्याचा गुन्हा पोलिसांनी दाखल केला आहे. सहायक फौजदार राजेश काळपुंड हे तपास करत आहेत.

## स्कूटी पडल्याने मारहाण

मीरा रोड : भाईंदर पूर्वेच्या गोडदेव नाका येथे राहणारे किरण घुसाळे व त्यांचा मित्र अरविंद तिवारी हे १ ऑक्टोबरच्या रात्री साडेदहा वाजता ज्योती बार बाहेर असताना तिवारीकडून अनोळखी व्यक्तीची स्कूटी खाली पडली. त्याचा राग येऊन त्या अनोळखी व्यक्तीने शिवीगाळ करत कपाळावर मारून दुखापत केली. किरण यांच्या फिर्यादीनंतर नवघर पोलिसांनी अनोळखी व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पू. पान क्र. ३

# महिन्याचे व्याज १० टक्के; ही अशी कसली सावकारी?

## व्याज भरताना काही जण येतात मेटाकुटीला : कायद्यामुळे पिळवणुकीवर

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** अडचणीच्या वेळी बँकेपेक्षा कमी वेळात पैसे मिळतात म्हणून खासगी सावकारांचा अनेकजण आधार घेतात. मात्र, तेच या व्याजाने पैसे घेणाऱ्यांना अनेकदा अडचणीत आणतात. पैसे तर मिळतात, पण भरमसाठ व्याज आकारले जाते आणि ते व्याज भरताभरता अनेकजण मेटाकुटीला येतात. काहीजण तर अगदी महिन्याला १०-१२ टक्के व्याज आकारत असल्याने ही असली सावकारी कसली, असा प्रश्न अनेकांकडून उपस्थित होतो.

सावकारांकडून गरजवंतांना तत्काळ पैसे मिळत असले तरी सावकार अव्वाच्या सव्वा व्याज लावतात. ते देणे अनेकांना शक्य होत नाही, तर ते देताना अनेकांचे पैशांचे गणित बिघडते. मात्र, राज्यात अनेक ठिकाणी सुरू असलेल्या सावकारांच्या जबरदस्तीला आता लगाम लागला आहे. नोंदणीकृत सावकार किती टक्क्याने व्याज घेऊ शकतो यासाठी निर्बंध घालण्यात आलेले आहेत. सावकारांच्या पिळवणुकीला निर्बंध घालण्यासाठी सरकारने १६ जानेवारी २०१४ रोजी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ हा कायदा राज्यभरात लागू केला.



### व्याज किती, कायदा काय सांगतो?

- राज्य सरकारने ठरवून दिलेल्या नियमानुसार, जर परवानाधारक सावकाराकडून शेतकऱ्याने तारण ठेवून कर्ज घेतले, तर सावकार ९ टक्के व्याजदर आकारू शकतो.
- त्याशिवाय विनातारण कर्जावर सावकाराला १२ टक्के व्याजदर आकारण्याची सवलत आहे. तसेच गैर शेतकरी लोकांना सावकार तारण कर्जाला १५ टक्के व्याजदर आकारू शकतो आणि विनाकारण कर्जाला १८ टक्के व्याजदर करू शकतो.

### नऊ महिन्यांत दोन गुन्हे दाखल

मागील नऊ महिन्यांच्या कालावधीत आचोळ्यात १७ मार्चला, तर तुळींज येथे २२ जानेवारीला दोन गुन्हे दाखल आहेत. याप्रकरणी पोलिसांनी तिघांवर कारवाई केली आहे.

### तक्रार कुठे कराल?

१. सावकारीतून जमीन बळकावली गेली असल्यास शेतकरी त्याची तक्रार तालुका स्तरावर सहायक निबंधक यांच्याकडे करतात.

२. त्यात सावकारीचे प्रकरण आढळून आले, तर त्याची सुनावणी ही जिल्हा उपनिबंधक यांच्या स्तरावर केली जाते. तसेच पोलिस प्रशासनाकडेही तक्रार करू शकतात.

### वसईत ४९ जणांकडे सावकारीचा परवाना

खासगी सावकारी करावयाची असल्यास उपनिबंधक कार्यालयाकडे नोंदणी बंधनकारक आहे. वसईमध्ये सध्या ४९ जण अधिकृत सावकार नोंदणीकृत आहेत. परवाना घेऊन सावकारी करणाऱ्यांची संख्या खूपच कमी आहे. त्यापेक्षा अनधिकृत सावकार गल्लीबोळात पाहावयास मिळतात. ग्रामीण भागात तर त्याचे पेव फुटले आहे.

### सावधान, खासगी सावकारी कराल तर लागेल मोक्का

कोणताही परवाना नसताना सावकारी व्यवसाय चालविणारे अनेकजण आहेत. वैयक्तिक पातळीवर व्यवसाय चालत असून मागणीप्रमाणे पैसे पुरविले जातात. परंतु, असा प्रकार उघडकीस आल्यास मोक्कांतर्गत कारवाईला सामोरे जावे लागू शकते. तसेच पाच वर्षांपर्यंत शिक्षा आणि दंडाची तरतूद आहे.

### पुरावे, कागदपत्रांसह पोलिसांना संपर्क साधा

आचोळे हद्दीत कोणाला सावकार कर्ज आणि व्याजाचा त्रास देत असेल तर त्यांनी योग्य तो पुरावा आणि कागदपत्रांसह स्थानिक पोलिस ठाण्याला संपर्क साधावा.

- बाळासाहेब पवार, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, आचोळे पोलिस ठाणे

# फेसबुक खात्यावरून बदनामी; गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेच्या मुर्धा गावात राम मंदिर आहे. मुर्धा राम मंदिर नावाने असलेल्या फेसबुक खात्यावर अनोळखी वापरकर्त्याने दोन टंकलिखित पाने पोस्ट केली होती. त्यामध्ये गावातील एका पती-पत्नीविरुद्ध अश्लील अपशब्द वापरले व शिवीगाळ केलेली होती. भटजी कधी मंदिरात आरतीला येत होते किंवा कधी येतात हे तुला माहीत नाही तसेच तू जे पेरले ना ते आज उगवते, असा मजकूर टंकलिखित केलेला होता. याप्रकरणी भाईंदर पोलिसांनी अनोळखी फेसबुक खातेधारकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सहायक पोलिस निरीक्षक चव्हाण हे अधिक तपास करत आहेत.

CamScanner

लोकमत पू. पान क्र. 4

# जबरी चोरी करणाऱ्या तीन आरोपींना अटक

## नायगाव गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** जबरी चोरी करणाऱ्या ३ आरोपींना अटक करण्यात नायगाव गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांना यश मिळाल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी श्रीकांत कारंडे यांनी बुधवारी दिली आहे.

मालाडच्या सह्याद्री अपार्टमेंटमध्ये राहणारे कबीर सय्यद (वय ४४) यांना सोबत असलेले अरमान व जयप्रकाश या तिघांना २१ सप्टेंबरला रात्री ३ वाजण्याच्या सुमारास चार आरोपींनी मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील बाफाणे ब्रीजजवळील एनी टाइम फूड हॉटेलजवळ लोखंडी रॉडने मारहाण केली. या मारहाणीत अरमानच्या उजव्या हाताचे हाड व डाव्या हाताचे अंगठ्याचे हाड फ्रॅक्चर झाले. तसेच, कबीर आणि जयप्रकाशला किरकोळ दुखापत झाली. आरोपींनी कारचे नुकसान करत कारमधील १३ हजार रोख रुपये आणि जयप्रकाशचा मोबाइल जबरीने खेचून चोरून पळून गेले. या घटनेत कबीर यांच्या गळ्यातील अडीच तोळे वजनाची सोन्याची चेन गहाळ झाली होती. नायगाव पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता.

### गुन्ह्याची दिली कबुली

- वरिष्ठांच्या सूचनेनुसार नायगावच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या वेगवेगळ्या टीम बनवून मुंबई-अहमदाबाद महामार्ग तसेच परिसरातील १०० पेक्षा जास्त सीसीटीव्ही व बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी नाजीम सिध्दकी (३३), उजेफा शेख (२२) आणि कुमार उर्फ कल्पेश भोईर (३२) यांनी केल्याचे निष्पन्न झाले. आरोपींना ताब्यात घेऊन कौशल्यपूर्ण चौकशी केल्यावर गुन्ह्याची कबुली दिल्याने अटक करण्यात आली. आरोपींनी गुन्हा करण्यासाठी वापरलेल्या १० लाख रुपये किमतीची इनोव्हा कार जप्त केली आहे.
- ही कामगिरी पोलिस उपायुक्त पौर्णिमा चौगुले-श्रींगी, सहाय्यक पोलिस आयुक्त नवनाथ घोगरे, नायगावचे वपोनि. रमेश भामे, पोलिस निरीक्षक (गुन्हे) सागर टिळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि. गणेश केकान, रोशन देवरे, पोलिस अंमलदार सचिन ओलेकर, सचिन मोहिते, सचिन खंताळ, जयवंत खंडवी, अमर पवार, चेतन ठाकरे, अशोक पाटील, पांडुरंग महाले यांनी केली आहे.

# मीरा रोडमधून दुचाकी चोरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोडच्या हाटकेश येथील लक्ष्मी कॉम्प्लेक्समध्ये राहणारे डिलिव्हरी बॉय संदीप शिव भालुका (वय ३१) यांनी त्यांची दुचाकी मीरा रोड स्टेशन रोड येथील ए. के. ऑप्टिक व निम्मी गारमेंट दुकानासमोर रात्री ११ च्या सुमारास उभी केली होती. तिची चोरी झाली आहे.

मध्यरात्री १:०० वाजता दुचाकी घेण्यास गेले असता ती चोरीला गेली होती. याप्रकरणी २ ऑक्टोबर रोजी नयानगर पोलिस ठाण्यात दुचाकी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार विकास यादव तपास करत आहेत.

# महिलेचा मोबाइल तोडला

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** काशिगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका महिलेचा मोबाइल तोडल्याची घटना घडली आहे.

आरोपी अनिल उर्फ निर्भय संतोष पांडे याने तू कोणाबरोबर फोनवर बोलते, माझ्याशी बोलत नाही, असे सांगून महिलेस शिवीगाळ करीत तिचा मोबाइल जमिनीवर आपटून फोडून नुकसान केले. या प्रकरणी काशिगाव पोलिसांनी २ ऑक्टोबर रोजी अनिल पांडेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. उपनिरीक्षक शेंडगे तपास करत आहेत.

# मीरा रोडवरून रिक्षा चोरीला

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोडच्या बेव्हर्ली पार्क भागात म्हाडा बिल्डिंगमध्ये राहणारे रिक्षाचालक समीर सफरुद्दीन सिद्दिकी यांनी त्यांची रिक्षा १५ नंबर बसस्टॉपजवळ उभी केली होती. ती रिक्षा अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे आढळून आले.

सिद्दिकी यांच्या फिर्यादीवरून २ ऑक्टोबर रोजी काशिगाव पोलिस ठाण्यात ५० हजार रुपये किमतीची रिक्षा चोरल्याप्रकरणी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. हवालदार परेश पाटील तपास करत आहेत.

पू. पान क्र. 1

# एटीएम कार्डची अदलाबदली



**नालासोपारा :** एटीएम कार्डची अदलाबदली करून फसवणूक करण्यात आल्याची घटना विरार येथे घडली आहे. मनवेलपाडा रोडवरील सहकारनगर येथील गोल्डन पार्क बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या सोनी चौधरी (३८) या मंगळवारी संध्याकाळी मनवेल पाडा येथील बँक ऑफ बडोदा बँकेच्या एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेल्या होत्या. यावेळी तेथे असलेल्या एका आरोपीने त्यांच्या एटीएम कार्डची अदलाबदली करून त्यांच्या बँक खात्यातून ९९ हजार ८७ रुपये काढून त्यांची फसवणूक केली. बुधवारी विरार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पुढारी पू. पान क्र. 2

# दिव्यांगांचा पुन्हा रास्ता रोको

## वाहतूककोंडीमुळे शाळकरी मुलांसह प्रवाशांची पंचाईत



**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदरमधील दिव्यांगांचे गेल्या १ ऑक्टोबरपासून सुरु असलेले आंदोलन गुरुवारी सुरूच ठेवण्यात आले. या दिवशी पुन्हा प्रशासनासोबतची चर्चा फिस्कटल्याने त्यांनी ऐन शाळा सुटण्याच्या व भरण्याच्या वेळेत रास्ता रोको केल्याने निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीमुळे शाळकरी मुलांसह प्रवाशांची पंचाईत झाल्याचे पहायला मिळाले.

दिव्यांगांनी मासिक पेन्शन वाढीसह इतर मागण्यांसाठी १ ऑक्टोबर रोजी केलेले आंदोलन गुरुवारी देखील सुरु ठेवले. यावेळी प्रशासनासोबत त्यांच्या चर्चेची दुसरी फेरी पार पडली. त्यात यंदाच्या अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार वाढीव पेन्शन देण्यास प्रशासनाने नकार देत पुढील अर्थसंकल्पात त्यासाठी तरतूद करण्याचे मान्य केले. मात्र त्याला अमान्य करीत दिव्यांगांनी दुपारच्यावेळेस पुन्हा रास्ता रोको केला. यामुळे दोन्ही बाजूस मोठ्याप्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. त्यातच हा रास्ता रोको ऐन शाळा सुटण्याच्या व भरण्याच्या वेळेत करण्यात आल्याने शाळकरी मुलांसह प्रवाशांची मोठी पंचाईत झाल्याचे पहायला मिळाले. शाळकरी मुलांनी पायपीट करीतच घर व शाळा गाठली. हा रास्ता रोको मागे घेण्यासाठी पोलिसांनी मध्यस्थी केली. मोठ्या विलंबाने हा रास्ता रोको मागे घेण्यात आल्यानंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली. दरम्यान मंगळवारपासून सुरू असलेले हे आंदोलन बुधवारी सायंकाळपर्यंत सुरूच होते. यासंबधी चर्चेत प्रशासनाकडून प्रलंबित मागण्यांवर पुन्हा चर्चा करण्याचे गाजर दाखविण्यात आले होते. मात्र त्यांच्या मागण्यांवर तोडगा न निघाल्यामुळे दिव्यांगांनी पालिका मुख्यालयासमोर रास्ता रोकोचे हत्यार उपसले. विशेष म्हणजे प्रशासनाविरोधात रोष व्यक्त करत सर्वपित्री अमावस्येचे औचित्य साधून प्रशासनाचे श्राद्ध घातले. मात्र सुरक्षेच्या दृष्टीकोनातून पोलिसांनी मध्यस्थी के ली होती.

पुढारी पू. पान क्र. 1

## नायगाव परिसरात रिक्षाची चोरी

**पालघर :** नायगाव पोलीस ठाणे हद्दीमध्ये लालसिंग चाळ परिसरातून एक रिक्षा चोरीला गेल्याची घटना घडली आहे. अजयकुमार यादव यांची ही रिक्षा होती. त्यांनी आपल्या चाळीसमोर ती उभी ठेवली होती. २९ सप्टेंबर रोजी अज्ञात चोरट्याने ती चोरून नेल्यानंतर यादव यांनी दिलेल्या तक्रारीनुसार नायगाव पोलिसांनी मंगळवारी वाहन चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

## तरुणाची आत्महत्या

**पालघर :** तुळींज पोलीस ठाणे क्षेत्रामध्ये एका २५ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. प्रियदर्शनी अपार्टमेंट येथे राहणाऱ्या मनीष परब या तरुणाने घरातील एका हूकला वायर बांधून त्याद्वारे गळफास घेतला. याप्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

पुण्यनगरी -पृ. पान क्र. 6

# प्लास्टिकच्या बंदुकीचा धाक दाखवून १० लाख लुटले



## पोलिसांनी तिघांना केली अटक

**मीरा रोड:** काशिमीरा परीसरातील राहणाऱ्या दुध व्यापाऱ्याच्या घरात घुसून आरोपींनी प्लास्टिकच्या बंदूकीचा धाक दाखवून त्यांच्या घरातून १० लाख रूपये रोख रक्कम चोरून नेली. ३ आरोपींना काशीगाव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने नालासोपारा येथून अटक केली आहे. आरोपीकडून १० लाख रुपये रोख रक्कम व इतर मुद्देमाल हस्तगत केला आहे.

मोहम्मद आदिल इलियास अहमद हे जनता नगर, बीएसयुपी इमारत न. १ , काशिगांव येथे राहत असून ते दुध व्यापारी आहेत. सोमवारी पहाटे ४ च्या सुमारास फिर्यादी यांचा मोठा भाऊ इफ्तिहार इलियास अहमद व लहान भाऊ अतिक अहमद हे नेहमी प्रमाणे त्यांच्या व्यवसायातील दुधाच्या गाड्या खाली करण्यासाठी निलकमल नाका, काशिमिरा येथे गेले होते. काही वेळात फिर्यादी आदिल इलियास अहमद व त्यांची पत्नी हे घरात झोपलेले असतांना कोणीतरी अनोळखी व्यक्तीने त्यांचा दरवाजा ठोठावला. त्यावेळी फिर्यादी यांच्या पत्नीने घराचा दरवाजा उघडला असता अचानक त्यांच्या घरामध्ये रंगाचा बुरखा परिधान केलेले दोन अनोळखी व्यक्ती व एक बुरखा परिधान केलेली अनोळखी महिला घरात घुसले. फिर्यादी व त्यांच्या पत्नीला मारहाण व दमदाटी केली व त्यातील एका बुरखा परिधान केलेल्याने त्यांच्याकडे असलेली प्लॅस्टीकची बंदूकीचा धाक दाखवून बेडरुममधील रोख रक्कम घेवून तिघेही पळून गेले. याप्रकरणी काशिगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी जुबेर फुरखान शेख ( २१ ) , कामरान इसहाक शेख (१९ ) , दोघेही रा. स्टार बिल्डींग, बुरहाण चौक, नालासोपारा पश्चिम, व महिला आरोपी यांना मंगळवारी गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. अटक आरोपी हे फिर्यादी यांचे नातेवाईक असून यातील आरोपी कामरान शेख याने यापूर्वी फिर्यादी व त्यांच्या भावांच्या दुधाच्या व्यवसायात त्यांच्या सोबत काम केले आहे.

# मुंबई-अहमदाबाद महामार्गालगत चरस जप्त

## पेल्हार गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी



**वसई:** मुंबई-अहमदाबाद मार्गालगत गस्त घालताना ३५ लाख ३६ हजार रुपयांचे चरस एका व्यक्तीकडून जप्त करण्याची कामगिरी पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेने केली आहे. महामार्गावर गस्त घालत असताना, पेल्हार गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी आणि अंमलदार यांना ग्रीन वसई नर्सरी-उमरकंपाऊन्ड सोपाराफाटा येथे एकजण संशयीतरित्या निळया रंगाची पिशवी घेऊन उभा असल्याचे दिसून आले. त्यामुळे त्याची कसून झडती घेतली असता, ८८४ ग्रॅम वजनाचा चरस हा अंमली पदार्थ सापडला. त्याची बाजरभावानुसार ३५ लाख ३६ हजार रुपये इतकी किंमत असल्याचे सांगण्यात आले. सुधीरकुमार शर्मा असे त्याचे नाव असून, पोलीस अंमलदार सुजय पाटील यांच्या माहितीनुसार गुंगीकारक औषधी द्रव्ये आणि मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम कलम ८ (क), २२ (ब) १ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरिक्षक जितेंद्र वनकोटी, पोलीस निरीक्षक कुमारगौरव धादवड, शकील शेख, उपनिरीक्षक तुकाराम भोपळे, हवालदार योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, वाल्मीक पाटील, मिथुन मोहिते, रवि वानखेडे, निखील मंडलिक, किरण आव्हाड, दिलदार शेख, अभिजित नेवारे, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील यांनी ही कामगिरी केली.

लोकसता पु. पान क्र. १

# ४१ अनधिकृत इमारती पाडणार

## नालासोपाऱ्यातील इमारतींवर कारवाईची पालिकेची प्रक्रिया सुरू

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** नालासोपाराच्या अग्रवाल नगरी येथील ४१ अनधिकृत इमारतींच्या रहिवाशांची याचिका फेटाळल्यानंतर वसई-विरार महापालिकेने या इमारती निष्कासित करण्याची कारवाई सुरू केली आहे. पालिकेने रहिवाशांना घरे खाली करण्याची नोटीस बजावली आहे. वीज खंडित करण्यासाठी महावितरणाला पत्र देणार असून कारवाईसाठी पोलीस बंदोबस्ताची मागणी करण्यात येणार आहे.

नालासोपारा पूर्वेच्या अग्रवाल नगरी येथे कचराभूमी (डंपिंग ग्राऊंड) आणि सांडपाणी प्रकल्पासाठी (एसटीपी) आरक्षित जागेवर तसेच खासगी जागा बळकावून ४१ अनधिकृत इमारती बांधण्यात आल्या आहेत. त्यात शेकडो कुटुंबे रहात आहेत. मुंबई उच्च न्यायालयाने या ४१ इमारती अनधिकृत ठरवून पालिकेला कारवाईचे निर्देश दिले होते. जुलै महिन्यात न्यायालयाने या इमारतींना कारवाईपासून संरक्षण देण्यास नकार दिला होता आणि महापालिकेने बजावलेल्या नोटिशींना अंतरिम स्थगिती दिली जाणार नसल्याचे स्पष्ट केले होते. मात्र पावसाळ्याचे दिवस लक्षात घेता कारवाईला ३० सप्टेंबरपर्यंत स्थगिती दिली होती.

### प्रकरण काय?

नालासोपारा पूर्वेच्या अग्रवाल नगरी येथे भूमापन क्रमांक (सर्व्हे नंबर) २२ ते ३० पर्यंतचा ३० एकरचा मोठा भूखंड होता. त्यातील काही भूखंड खासगी तर काही भूखंड हा कचराभूमी (डंपिंग ग्राऊंड) आणि सांडपाणी प्रकल्पासाठी (एसटीपी) आरक्षित होता.२००६ मध्ये ही जमीन माजी नगरसेवक सीताराम गुप्ता व त्यांचे पुतणे अरुण गुप्ता यांनी बळकावून जमिनीवर बनावट बांधकाम परवानगी (सीसी) आणि भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) बनवून तसेच इतर कागदपत्रांच्या सहाय्याने या अनधिकृत ईमारती बांधण्यात आल्या आहेत. २०१० ते २०१२ या कालावधीत येथे ४१ अनधिकृत इमारती उभ्या राहिल्या होत्या. याविरोधात जमीन मालक अजय शर्मा यांनी उच्च न्यायालयात धाव घेत जनहीत याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने या ४१ इमारती बेकायदेशीर ठरवून त्यावर कारवाई करण्याचे निर्देश महापालिकेला दिले होते.



रहिवाशांनी न्यायालयात पुन्हा धाव घेतली होती. त्यावर १ ऑक्टोबर रोजी सुनावणी झाली. त्यावेळी न्यायालयाने रहिवाशांची याचिका फेटाळून लावली आणि आणि पालिकेला कारवाईचे निर्देश दिले .

आम्हाला उच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत प्राप्त झाली असून या ४१ इमारतींवर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार आम्ही प्रक्रिया सुरू केली आहे अशी माहिती पालिकेच्या प्रभाग समिती 'ड' चे सहाय्यक आयुक्त मोहन संखे यांनी दिली. उच्च न्यायालयाकडून दिलासा न मिळाल्याने या इमारतींमधील रहिवाशी हवालदील झाले आहेत. पालिकेने घरे खाली करण्यासंदर्भातील फलकही लावले आहे. या निर्णयाविरोधात रहिवाशांतर्फे सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली जाणार आहे.

# वसईत सुरक्षेसाठी दीड हजार पोलीस

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई:** नवरात्रोत्सव साजरा करताना कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे. मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत दीड हजार पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

शहरातील जीवदानी, चंडिका, धारावी, सोनूआई, महालक्ष्मी, कालिका माता या प्रसिद्ध मातांच्या मंदिरातही विविध ठिकाणाहून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत असतात.तर दुसरीकडे अनेक ठिकाणी गरबा नृत्यांचे कार्यक्रम आयोजित केले जातात. उत्सव साजरा होत असताना कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी मीरा भाईंदर व वसई विरार आयुक्तालयाची पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे.

यात ४२ पोलीस निरीक्षक , १६१ सहायक पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक, ९४८पोलीस अंमलदार, ३०० होमगार्ड, १९३ महाराष्ट्र सुरक्षा बलाचे कर्मचारी, एसआरपीएफची तुकडी असा दीड हजाराहून अधिक पोलिसांचा बंदोबस्त या नवरात्री निमित्ताने ठेवण्यात आला आहे. नवरात्रीच्या पहिल्या दिवसांपासून ते घट विसर्जन सोहळा पार पडेपर्यंत पोलिसांचा फौजफाटा शहरात तैनात असणार आहे.

### पोलिसांकडून सूचना

नवरात्री उत्सवात रस्त्यावर मंडप घालताना वाहतूक कोंडी होऊ नये याची खबरदारी घेणे, गाणी वाजवताना आवाज मर्यादेचे पालन, उत्सव साजरा करताना रीतसर परवानगी घेणे, नवरात्र उत्सव साजरा करताना कोणाच्याही धार्मिक भावना दुखावणार नाहीत याची दक्षता घेणे अशा सर्व सूचना पोलिसांकडून आयोजकांना केल्या आहेत. नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल असा इशारा पोलिसांनी दिला आहे. नागरिकांनीही उत्सव साजरा करताना आपल्या हातून अनुचित प्रकार घडणार नाही याची काळजी घ्यावी असे आवाहनही नागरिकांना करण्यात येत आहे.

CS CamScanner

म.टा.पु. पान क्र. 2

# मिरा-भाईंदर, वसई-विरारमधून आक्षेपार्ह व्हिडीओ अपलोड

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

मिरा-भाईंदर व वसई-विरार परिसरांतून समाज माध्यमांवर बालकांचे लैंगिक चित्रण अपलोड करण्यात आले आहेत. ही माहिती अल्पवयीन मुलांशी संबंधित विषयांवर जागतिक स्तरावर काम करणाऱ्या एका संस्थेने दिलेल्या अहवालातून समोर आली आहे. त्याआधारे आता बालकांचे लैंगिक चित्रण अपलोड करणाऱ्यांची माहिती कारवाईच्या अनुषंगाने गोळा करण्याचे काम मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांनी हाती घेतले आहे.

जागतिक स्तरावर 'नेकमेक' नामक संस्था विविध समाजमाध्यमांवरील अल्पवयीन मुलांचे लैंगिक चित्रण तसेच अपहरण किंवा शोषण आदींची माहिती गोळा करण्याचे काम करीत आहे. त्यांना मिळालेली माहिती संबंधित देशाला आवश्यक कारवाईच्या अनुषंगाने कळवली जाते. या संस्थेने भारतातील विविध भागांतून बालकांचे लैंगिक चित्रण अपलोड झाल्याच्या माहितीचा अहवाल सीबीआयला सादर केला आहे. यामध्ये मिरा-भाईंदर व वसई-विरार परिसरांचा समावेश



असल्याचे स्पष्ट झाले आहे.

सीबीआयने त्यांना मिळालेल्या माहितीनंतर पुढील कारवाईसाठी दिली आहे. त्यानुसार राज्याच्या पोलिस महासंचालक कार्यालयाने मिरा-भाईंदर तसेच वसई-विरार पोलिस आयुक्तालयाला ही माहिती पाठवली आहे. यात अनेक इंटरनेट प्रोटोकॉल अॅड्रेस म्हणजेच 'आयपी अॅड्रेस'चा समावेश आहे. भारतात बालकांचे लैंगिक चित्रण असलेले व्हिडीओ पाहणे किंवा ते समाज माध्यमांवरून डाऊनलोड करणे किंवा अपलोड करणे, यास माहिती-तंत्रज्ञान कायद्यांतर्गत बंदी आहे. त्यामुळे त्यांना मिळालेल्या आयपी अॅड्रेसची सविस्तर, म्हणजेच विशिष्ट कोणत्या परिसरातून ते अपलोड करण्यात आले, संबंधित सिमकार्ड कोणाच्या नावावर आहे व इतर माहिती प्राप्त करण्याचे काम सायबर शाखेकडून केले जात आहे. ती मिळताच संबंधित परिसरांतील पोलिसांना त्याची सूचना देत गुन्हे दाखल केले जाणार आहेत. जागतिक संस्थेकडून पोलिस आयुक्तालयाला माहिती देईपर्यंत सुमारे दोन वर्षांचा कालावधी गेला आहे. त्यामुळे आयपी शोधण्यात पोलिसांना अडचणीचे झाले आहे.

**“ समाजमाध्यमांवर अपलोड करण्यात आलेले मुलांचे अश्लिल चित्रण करणारे व्हिडीओ शहरात चित्रित करण्यात आले, असा कोणताही प्रकार झालेला नाही. ते केवळ माध्यमांवर अपलोड करण्यात किंवा इंटरनेटवर शोधण्यात आले आहेत. यात विविध पद्धतीने व्हायरल व्हिडिओंचाही समावेश आहे. तसेच काही व्हिडीओ परदेशातील आहेत.**

**सुजीतकुमार गुंजकर**
-पोलिस निरीक्षक, सायबर शाखा
मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस

नवभारत पृ. पान क्र. ३

# भाईंदर में नवरात्रोत्सव पर चढ़ा चुनावी रंग

## वोटरों को आकर्षित करने की कवायद, त्योहार पर डांडिया-गरबा संग पुरस्कारों की धूम

**विनोद मिश्रा@नवभारत**

भाईंदर. राजनीति और धर्म का तो सदियों से चोली दामन का साथ रहा है, लेकिन अब सभी प्रमुख धार्मिक उत्सवों पर भी राजनीति का रंग चढ़ने लगा है. यह रंग तब और भी प्रगाढ़ हो जाता है, जब चुनावी समर करीब होता है. ऐसा ही कुछ नजारा इन दिनों मां आदि शक्ति के उपासना के पर्व नवरात्रोत्सव में दिखाई दे रहा हैं. बड़े-बड़े आयोजनों के माध्यम से वोटरों को आकर्षित करने की कवायद देखी जा रही है. इन सब बातों को दर किनार कर श्रद्धालुओं और भक्तों को भी ऐसे आयोजनों का इंतजार रहता है. जहां वे उन्मुक्त भाव से अपने अंदर की छुपी हुई कलाओं को नाच गा कर उजागर करते हैं और आयोजनों का आनंद लूटते हैं. साथ ही अपनी श्रद्धा और भक्ति की अभिव्यक्ति को भी प्रदर्शित करते हैं. मीरा-भाईंदर शहर में नवरात्रोत्सव पर्व के अवसर पर डांडिया-गरबा के कई अलग-अलग बड़े आयोजन किए गए हैं. जिसके प्रमुख आयोजक बीजेपी के पूर्व विधायक नरेंद्र मेहता, शिवसेना विधायक प्रताप सरनाईक, नागोबा फाउंडेशन के शंकर विरकर, कांग्रेस के निवर्तमान नगरसेवक राजीव मेहरा और मनुभाई मेहता की स्मृति में मैक्सस मॉल के एसी डोम और विधायक गीता जैन हैं.

### ईस्ट वेस्ट फाउंडेशन के 'लोटस सीजन 5' की धूम

बीजेपी के पूर्व विधायक नरेंद्र मेहता की ईस्ट वेस्ट फाउंडेशन द्वारा आयोजित 'लोटस सीजन 5' की धूम है. यहां प्रतिदिन किसी न किसी लोकप्रिय अभिनेता -अभिनेत्री का आगमन होता है. ईस्ट-वेस्ट फाउंडेशन की ओर से भाईंदर पश्चिम के प्लेनेटेरिया कांप्लेक्स के पास इस बार भी लोटस नवरात्र का आयोजन की गई है. आयोजक नरेंद्र मेहता ने बताया कि इस बार डांडिया 10 की जगह नौ दिन ही रहेगी. इसके बाद इसी स्थान पर जया किशोरी की कथा शुरू होगी. यहां प्रसिद्ध युवा लोकगायक हैरी नाकूम की टीम अपनी गरबा गीतों की प्रस्तुति दे रहे हैं, यहां की फ्लोर वुडन (लकड़ी) की बनाई गई है. यहां पर प्रवेश पास के माध्यम से दी जा रही है. यहां प्रतिदिन 8 से 10 हजार गरबा-डांडिया प्रेमी रंग विरंगे परिधान में डांडिया बीट पर थिरकते नजर आ आते हैं. यहां उत्कृष्ट प्रदर्शन करने वालों को पुरस्कार दिए जा रहे हैं.

### प्रतिदिन पुरस्कृत किए जाएंगे विजेता

शिवसेना विधायक प्रताप सरनाईक की प्रताप फाउंडेशन द्वारा इस वर्ष मीरारोड में सेवन स्क्वायर अकादमी के पीछे की मैदान में नवरात्रोत्सव का आयोजन किया गया हैं. कार्यक्रम के आयोजन में जीएम इलेक्ट्रॉनिक का भी योगदान है. यहां भी गरबा खेलने वालों के लिए वुडेन (लकड़ी) की फ्लोर बनाई गई है. विधायक प्रताप सरनाईक ने बताया कि इस बार गुजराती लोकगायक भाविन शास्त्री की टीम यहां प्रस्तुति दे रहे हैं. उन्होंने कहा कि बेहतर प्रदर्शन करने वाले युगल और युवतियों के लिए प्रतिदिन पुरस्कृत किए जाएंगे. आयोजन से जुड़े पुर्वेश सरनाईक ने कहा कि नवरात्र का व्यवसायीकरण हो गया है, लेकिन यहां मुफ्त पास की व्यवस्था कर हमने संस्कृति के संवर्धन का प्रयास शुरू किया है. यहां भी गरबा - डांडिया प्रेमियों की भारी भीड़ उमड़ रही है. नवरात्रोत्सव के दौरान राज्य के मुख्यमंत्री एकनाथ शिंदे और कई नेता भी इस आयोजन में सम्मिलित होंगे.

### गरबा का भव्य आयोजन, कार्पेट की फ्लोर बनकर हो गई है तैयार

भाईंदर पूर्व के इंद्रलोक परिसर के बालासाहेब ठाकरे मैदान में शंकर विरकर के ₹ नागोबा फाउंडेशन₹ द्वारा डांडिया और गरबा का भव्य आयोजन किया गया है. विरकर विगत 14 वर्षों से इसका आयोजन कर रहे हैं. इस मैदान की क्षमता 4 से 5 हजार लोगों की है. फाउंडेशन की ट्रस्टी आकांक्षा विरकर ने बताया की नवरात्रोत्सव में प्रतिदिन बेहतर प्रदर्शन करने वालों को यहां प्रतिदिन अलग-अलग पुरस्कारों से पुरस्कृत किया जा रहा है. इसके अलावा मुफ्त स्वास्थ्य जांच शिविर की भी व्यवस्था की गई है. यहां गरबा प्रेमियों के लिए मैदान पर कारपेट का फ्लोर तैयार किया गया है. मीरा रोड शीतल नगर में कांग्रेस के निवर्तमान नगरसेवक राजीव मेहरा की एकता ग्रुप द्वारा वातानुकूलित (ए सी) डांडिया का आयोजन किया गया है. नवरात्रोत्सव का इस वर्ष रजत वर्ष भी है, 25 वर्षों से लगातार एकता ग्रुप द्वारा यह आयोजन यहां किया जा रहा है. यहां भी गरबा प्रेमियों के लिए कार्पेट की फ्लोर बनाई जाती है. पहली बार गुजरात के प्रसिद्ध गायक गुलाब राठौर, भारत राठौड, श्वेता की टीम गुजरात से आई हुई हैं. इस मैदान की क्षमता भी 4 से 5 हजार लोगों की है. यहां डांडिया और गरबा प्रेमियों को ए सी की ठंडी ठंडी कूल कूल वातावरण में थिरकने का आनंद मिलता है.



### सुरक्षा के किए गए पुख्ता इंतजाम

इस वर्ष पहली बार मनु भाई मेहता फाउंडेशन द्वारा भाईंदर पश्चिम के मैक्सस मॉल में पांचवी मंजिल पर भव्य लग्जरी ए सी डोम में गरबा और डांडिया का आयोजन किया गया है. प्रसिद्ध भवन निर्माता व समाजसेवक मनुभाई मेहता की स्मृति में उनके सुपुत्र विशाल और रशेस मेहता ने यह आयोजन किया है. विशाल मेहता ने बताया की बॉलीवुड के प्रसिद्ध सिंगर याशिता शर्मा और हर्षित चौहान की टीम यहां अपने संगितों का जादू बिखेरेंगे. पहले इस तरह के आयोजन मुंबई में ही होते थे, यहां 500 गाड़ियों के पार्किंग और सुरक्षा के पुख्ता इंतजाम किए गए हैं.



नवभारत पृ. पान क्र. ३

### पुलिस आयुक्त ने किया तीन सदस्यीय समिति का गठन

# कानूनी जांच के दायरे में लाए जाएंगे लॉजिस्टिक्स

■ मीरा-भाईंदर, (सं). मीरा - भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय (एमबीवीवी ) द्वारा अब लॉजिस्टिक्स, हाउसकीपिंग, केयरटेकिंग और अन्य सेवाओं सहित मैनपावर सप्लाई करने वालों की जांच शुरू करेगी. साथ ही ऐसे किसी भी जिम्मेदारी के लिए भर्ती और कार्यरत करने से पूर्व नौकरी के इच्छुक लोगों का पुलिस वेरिफिकेशन अनिवार्य किए जाने पर भी विचार कर रही है. इसके लिए पुलिस आयुक्त मधुकर पांडे ने एक तीन सदस्यीय समिति का गठन किया है. जिसमें अतिरिक्त पुलिस आयुक्त के नेतृत्व में दो डीसीपी का समावेश है. यह समिति यह निर्धारित करेगी की इस तरह के मैन पावर सप्लाई करने वाले एजेंसियों को किस तरह कानूनी जांच के दायरे में लाई जा सकेगी.



*हमने इस मुद्दे पर विस्तृत विश्लेषण करने और स्टाफिंग और पेरोल सेवा एजेंसियों पर नजर रखने के लिए आवश्यक प्रोटोकॉल और प्रक्रियाओं को रेखांकित करने के लिए उपयुक्त कानूनी प्रक्रिया की सिफारिश करने के लिए अतिरिक्त पुलिस आयुक्त के नेतृत्व में दो डीसीपी वाली तीन सदस्यीय समिति बनाई है. समिति की सिफारिशों के आधार पर, ऐसी एजेंसियों पर कुछ नियंत्रण लाने के लिए उचित कदम उठाए जाएंगे*

*- मधुकर पांडे, आयुक्त, MBVV पुलिस आयुक्तालय*

## सेवानिवृत्त रेलवे अधिकारी पर क्रूरतापूर्वक हमला

सिफारिशों के अनुसार इसको कानूनी जामा पहनाकर क्रियान्वित की जाएगी. दरअसल नशे में धुत एक केयरटेकर द्वारा 78 वर्षीय बिस्तर पर पड़े सेवानिवृत्त रेलवे अधिकारी पर क्रूरतापूर्वक हमला किए जाने की घटना घटित हुई है. जिसमें उन्हें पसलियों में फ्रेक्चर सहित गंभीर चोटें आई है. बुजुर्ग पर क्रूरतापूर्वक किए गए इस हमले के बाद निजी एजेंसियों के लिए भर्ती प्रक्रिया को कानून के दायरे में लाने की प्रक्रिया एमबीवीवी पुलिस ने शुरू की है.घटना में शामिल आरोपी केयरटेकर था, जो अभी भी फरार है, उसे एक निजी नर्सिंग होम ब्यूरो के माध्यम से काम पर रखा गया था. वर्तमान में निजी सुरक्षा एजेंसी विनियमन अधिनियम 2005 के तहत केवल निजी सुरक्षा गार्ड सप्लाई करने वाले एजेंसियों तक ही यह नियम लागू है. जबकि घरेलू क्षेत्र में मैनपावर की आपूर्ति का व्यवसाय बढ़ती मांग के कारण तेजी से फल-फूल रहा है, जिसमें देखभाल करने वाले, गृहिणी, नर्सिंग स्टाफ और ड्राइवर आदि शामिल हैं. सुरक्षा गार्ड सप्लाई करने वाले निजी एजेंसियों की तुलना में यह प्लेसमेंट क्षेत्र काफी हद तक अनियमित है.

# नवरात्रोत्सव के लिए MBVV पुलिस सज्ज

मीरा-भाईंदर. नवरात्रोत्सव के लिए मीरा - भाईंदर,वसई विरार पुलिस पूरी तरह से सज्ज है. शहर कानून व्यवस्था और शांति कायम रखने के लिए पुलिस की कई टीम तैनात की गई है. पुलिस ने सुरक्षा की व्यापक तैयारी की है. नवरात्रोत्सव के दौरान कोई अप्रिय घटना घटित नहीं हो इसके लिए स्वयं पुलिस आयुक्त मधुकर पांडे, अतिरिक्त पुलिस आयुक्त दत्तात्रय शिंदे, मीरा-भाईंदर जोन-1 के पुलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड़, सहायक पुलिस आयुक्त दीपाली खन्ना, डॉ. विजयकुमार मराठे और राजेंद्र मोकाशी निगरानी रख रहे हैं.नवरात्रोत्सव के बंदोबस्त के लिए 17 पुलिस निरीक्षक, 53 सहायक निरीक्षक और उप-निरीक्षक, 268 पुलिस कांस्टेबल, 100 होम गार्ड, 44 महाराष्ट्र सुरक्षा बल के जवान, 1 दंगा नियंत्रण दस्ता और राज्य रिजर्व पुलिस बल के एक पथक को मीरा-भाईंदर में तैनात किया गया है . इसके अलावा, पुलिस मुख्यालय में तत्काल जरूरतों के लिए 70 पुलिस कांस्टेबल, 20 महाराष्ट्र सुरक्षा बल के जवान और 5 दंगा नियंत्रण टीमों को रिजर्व में रखा गया है.

### चप्पे-चप्पे पर तैनात रहेगी पुलिस बल

CamScanner

नवभारत पृ. पान क्र 3

**जन समस्या** | महामार्ग और चिंचोटी रोड की समस्या से लोगों में आक्रोश, आंदोलन की चेतावनी

# यातायात जाम से विद्यार्थी और स्थानीय परेशान

## अब इसके खिलाफ जाएंगे न्यायालय : विजय पाटिल

■ वसई, (सं). मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग और कामण-चिंचोटी-भिवंडी रोड पर लगातार यातायात जाम की समस्या पैदा होने लगी है. इस समस्या से आक्रोषित विद्यार्थियों और स्थानीय भूमिपुत्रों ने चिंचोटी में सड़क जाम कर अपना गुस्सा जाहिर किया है. वहीं, कांग्रेसी नेता विजय पाटिल अब इस मामले को लेकर न्यायालय जाने की तैयारी में हैं. वसई पूर्व के कामण, चिंचोटी, पोमान, नागले, मालजीपाड़ा, ससूनवघर, ससुपाड़ा जैसे अन्य गांवों में रहने वाले स्कूल और कॉलेज के विद्यार्थी पढ़ने के लिए वसई, विरार, नायगांव, जुचंद्र जैसी जगहों पर स्कूल और कॉलेज जाते हैं. वहां तक पहुंचने के लिए केवल दो मार्ग हैं. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग और कामण चिंचोटी. अब इस मार्ग पर यातायात जाम की समस्या उत्पन्न होने लगी है.



## सड़क जामकर किया प्रदर्शन, डीएम ने किया था दौरा

अब परीक्षाएं भी नजदीक हैं, ऐसे में छात्रों को अधिक परेशानी होने की संभावना है.बुधवार की शाम भूमिपुत्र संगठन और गुस्साए नागरिकों ने चिंचोटी में सड़क जाम कर विरोध प्रदर्शन किया. इस दौरान आंदोलनकारियों ने कहा कि महामार्ग का काम भी घटिया गुणवत्ता का है. चिंचोटी-कामन, भिवंडी मार्ग भी खस्ताहाल में है. इसके चलते यातायात जाम की समस्या उत्पन्न हो रही है. 22 जुलाई को जिलाधिकारी ने महामार्ग का दौरा कर पैदल निरीक्षण किया था. इसके बाद कहा गया था कि समस्या का समाधान कर दिया जायेगा. लेकिन आज तक कोई समाधान नहीं निकल सका है. भूमिपुत्र संघठन के अध्यक्ष सुशांत पाटिल ने आरोप लगाया है कि हाईवे पर विपरीत दिशा में जाने वाले आरएमसी वाहनों के खिलाफ कोई कार्रवाई नहीं की जाती है.

## वाहनों के खिलाफ कोई कार्रवाई नहीं होती

जिसके चलते यातायात जाम होती है. स्कूली छात्र-छात्राओं व उनके अभिभावकों ने सवाल करते हुए कहा कि जाम के कारण स्कूल बस तीन से चार घंटे तक फंसी रहती है और बच्चों को लघुशंका व अन्य परेशानी हो तो हम कहां जाएं. साथ ही प्रदर्शनकारियों ने मांग किया है कि जब तक यातायात व्यवस्था और सड़क का काम पूरा नहीं हो जाता तब तक टोल बंद किया जाए. इस आंदोलन की कारण कुछ देर के लिए सड़क पर यातायात जाम की समस्या पैदा हो गई. इस विरोध प्रदर्शन में स्कूली छात्रों सहित सैकड़ों नागरिक शामिल हुए.

*महामार्ग व अन्य समस्याओं के संबंध में हाईवे अथॉरिटी, लोक निर्माण, महानगरपालिका, पुलिस प्रशासन को बार- बार पत्राचार कर समाधान का अनुरोध किया गया है. लेकिन अधिकारी इसे नजरअंदाज कर रहे हैं, इसलिए अब कोई उपाय नही किया जा रहा है. इसका खामियाजा नागरिकों को भुगतना पड़ रहा है. अब इसके खिलाफ कोर्ट जाएंगे.*

*- विजय पाटिल (कांग्रेस नेता)*

नवभारत पृ. पान क्र. 4

12 साल की बच्ची के साथ कांग्रेस नेता का घिनौना कृत्य सामने आया

# बीजेपी युवा मोर्चा ने किया आंदोलन

भाईंदर. चंद्रपुर जिले के कोरपना में 12 वर्ष की मासूम बच्ची के साथ वहां के कांग्रेस युवा अध्यक्ष अमोल लोदे द्वारा की गई हैवानियत और दुराचार के विरोध में बीजेपी युवा मोर्चा द्वारा गुरुवार को निषेध आंदोलन किया गया. मीरा भाईंदर बीजेपी जिलाध्यक्ष किशोर शर्मा, 145-विधानसभा चुनाव प्रमुख एड. रवि व्यास और युवा मोर्चा जिलाध्यक्ष पंकज पांडे ( दरोगा) के मार्गदर्शन में भाईंदर पश्चिम के मैक्सस मॉल चौक पर तीव्र निषेध व्यक्त किया गया. इस निषेध आंदोलन में युवा मोर्चा के पदाधिकारी, कार्यकर्ता बड़ी संख्या में निषेध व्यक्त करने वाले बैनर और तख्तियां लेकर उपस्थित थे.



## ऐसे विकृत लोगों को फांसी दो

उन्होंने सरकार से यह निवेदन किया कि ऐसे विकृत मानसिकता वालों को फांसी दो. बता दें कि बदलापुर जैसा एक और मामला सामने आया है. चंद्रपुर जिले के कोरपना में एक स्कूल के शिक्षक ने एक्स्ट्रा क्लासेस के बहाने छात्रा को स्कूल बुलाकर उसके साथ दुराचार किया. पुलिस ने आरोपी के खिलाफ शिकायत दर्ज कर उसे गिरफ्तार कर लिया है. आरोपी अमोल लोडे युवा कांग्रेस का कोरपना शहर अध्यक्ष है. इसके साथ ही वह एक कॉन्वेंट स्कूल में शिक्षक भी है.

CamScanner

N. B. T. पान क्र. 7

## शादी का झांसा देकर रेप का आरोप

■ निसं, नालासोपारा: शहर में 20 वर्षीय युवती ने परिचित पर शादी करने झांसा देकर कई दिन तक रेप का आरोप लगाया है। युवती को जब पता चला कि वह शादीशुदा है, तो उसने पुलिस स्टेशन में मामला दर्ज कराया। आरोप है कि युवक उसे 15 सितंबर को अपने घर ले गया, जहां कई दिन तक रेप किया।

## सड़क हादसे में किशोर की मौत

■ निसं, वसई: वालीव पुलिस स्टेशन क्षेत्र के मधुबन इलाके में एक तेज रफ्तार कार की चपेट में आने से 13 वर्षीय किशोर की मौत हो गई। हादसे के बाद आरोपी कार चालक फरार हो गया। संजय दोस्तों के साथ खेलने मधुबन इलाके में जा रहा था, तभी रास्ते में उसे कार ने टक्कर मार दी।

## सड़क पार करते गई युवक की जान

■ निसं, नालासोपारा: मुंबई-अहमदाबाद हाइवे के सोपारा फाटा पर सड़क पार करते वक्त 28 वर्षीय युवक की मौत हो गई। पंकज यादव अपने मालिक के पास पैसे लेने के लिए हाइवे पर गया था। इस बीच, हाइवे पार करते वक्त अज्ञात वाहन ने उसे टक्कर मार दी।

# यूपी का गैंगस्टर वारदात से पूर्व अरेस्ट



■ निसं, नालासोपारा: पेल्हार पुलिस ने 28 सितंबर की रात संतोष भुवन इलाके से जिन तीन लोगों को पिस्टल के साथ गिरफ्तार किया था, उनमें से एक आरोपी उत्तर प्रदेश का कुख्यात गैंगस्टर है। उस पर यूपी के अलग-अलग पुलिस स्टेशनों में 24 से अधिक आपराधिक मामले दर्ज हैं। बताया जा रहा है कि वह यूपी से किसी की हत्या करने के लिए दो शूटरों के साथ नालासोपारा आया था, लेकिन वारदात से पहले पकड़ा गया। पुलिस ने बताया कि वह यूपी में कृपाशंकर 42-43 नाम से खुद की गैंग चलाता है।

सीनियर पीआई जितेन्द्र वनकोटी ने बताया कि 28 सितंबर की रात लगभग 8 बजे उन्हें सूचना मिली कि तीन लोग हथियार लेकर संतोष भुवन स्थित ओम साई नगर में आने वाले है। पुलिस टीम ने तीन संदिग्ध आरोपियों को हिरासत में लेकर तलाशी ली, तो उनके पास से देशी पिस्टल और पांच कारतूस बरामद हुए थे।

The Time of India - 2,9

# 21-year-old robs uncle of ₹10L to repay loan app debt

**Mumbai:** Zubair Shaikh, a 21-year-old man from Nalasopara, who was unable to pay Rs 8 lakh taken from a loan app and was facing threats from unknown callers, along with his girlfriend Iqra Shaikh (21) and roommate Kamran Shaikh (19), committed a theft at his uncle's Mira Road residence, making off with Rs 10 lakh in the early hours of Monday. The trio, disguised in burqas and armed with a plastic toy gun, also threatened Adil Ahmed, a differently-abled milk distributor, and his wife.

The incident took place around 4.30 am when Ahmed and his wife were asleep. A knock on the door woke up Ahmed who opened the door to find three burqa clad persons. They barged into the flat and threatened the couple with a toy gun. One of the men went straight into the bedroom and took away Rs 10 lakh kept in the cupboard. They pushed the couple to the floor, assaulted them and fled. By examining CCTV footage from around 20 locations, the Kashigaon police traced the suspects to a car owned by a person in Badlapur, who had sold the vehicle to someone in Naya Nagar. This lead brought them to Zubair, who had borrowed the car.

During interrogation, Zubair revealed that he had fallen victim to a loan app scam, which left him in debt. Unable to repay the borrowed money, Kamran, a former employee of Ahmed, suggested robbing his uncle. Kamran was aware that Ahmed and his two brothers, who lived with him, would leave the house around 4 am every day to collect and distribute milk packets. The three accused, all of them from Nalasopara, have been arrested and the stolen Rs 10 lakh recovered. They also seized the toy gun and the car used in the crime. — Sandhya Nair

# Peeping Tom held, Pocso invoked

**Mumbai:** A 25-year-old man working in a private hospital was taken into custody for allegedly stalking and peeping into the home of a minor girl in Bhayander. The accused has been charged under Pocso Act. The man had been stalking the girl for two months. He grew more audacious, going as far as showing up outside her tenement and peeping through the window when the minor was taking a bath. On Tuesday, the accused was caught on CCTV lurking outside the minor's home and nabbed by MNS activists. TNN

The Free Press Journal
P-9

# Using toy gun, 3 loot ₹10 lakh from bizman

**Suresh Golani**
MIRA BHAYANDAR

Less than 36 hours after entering the house of a milk supplier and decamping with Rs10 lakh, three people including a woman were arrested by the crime detection unit of the Kashigaon police for their involvement in the crime using a toy gun.

According to the police, the incident was reported from a flat in the basic services to the urban poor (BSUP) building in Janta Nagar at around 5am on September 30.

The complainant Mohammed Adil Ilyas Ahmed, 29, said that after hearing knocks on their door, his wife woke up to open it. Three burqa-clad people barged into the flat. One of them caught hold of Ahmed's wife, while his accomplice whipped out a gun from a bag. They assaulted the couple before decamping with a bag containing Rs10 lakh. Following investigations, the police zeroed in on the Jubeir Furqan Khan, 21, Kamran Ishaq Shaikh, 19, and their 23-year-old female accomplice — all residents of Nallasopara. The police said that they have recovered the money from the trio who turned out to be distant relatives of the complainant.

ite surge